REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 6 | MARCH - 2022

# माणसातल्या माणूसपणाचा शोध घेणारा नाटककार : अभिराम भडकमकर

**प्रा. डॉ. रविंद्र म. कांबळे**
**श्री एम डी शाह महिला कॉलेज मालाड प. मुंबई**

**प्रस्तावना:**



भारतात मराठी रंगभूमी ही अग्रेसर मानली जाते. प्राचीन काळापासून अनेक लोककला प्रकारामध्ये नाट्य हा कलाप्रकार रुजलेला दिसून येतो. मराठी नाटकात आजवर अनेक बदल झाले. नवीन प्रवाह, तंत्रज्ञान आणि काळाबरोबरच नाटकाचे विषय व प्रयोजनही बदलत गेले. मनोरंजनाबरोबरच प्रबोधन ही गरजचे वाटू लागले. संगीतप्रधान, पौराणिक, सामाजिक, राजकीय, कौटुबिक व त्यानंतर मध्यमवर्गीय, विनोदी, दलित, ग्रामीण, कामगार, व बाल्यनाट्ये उदयास आली. नाट्याच्या अनेक चळवळी ही उदयास आल्या. त्यामुळे नाटक अधिकच समृद्ध होत गेले. १९९० नंतरच्या कालखंडातील नाटककरांचा विचार करताना अभिराम भडकमकर हे एक प्रामुख्याने नाव समोर येते. सामाजिक समस्या, कौटुबिक जीवन व बदलत्या काळातील प्रश्न घेऊन त्यांचे नाटक प्रकर्षाने समोर येते. सामाजिक, विषयालादेखील त्यांनी कलात्मक पद्धतीने व्यक्त केले आहे. तसेच बदलते भोवतालचे जीवन, बदलणारी पिढी, त्यांचे दृष्टीकोन, उदरनिर्वाहासाठी ग्रामीण भागातून शहरात आलेल्यांचा संघर्ष त्यांच्या नाटकात प्रकर्षाने जाणवते.

२१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर असतानाच औद्योगिक क्रांती झाली. राजकीय, सामाजिक व धार्मिक घटनांनी समाजजीवन ढवळून निघाले. टी.व्ही. प्रसारमाध्यमे, माहिती तंत्रज्ञान यांचा परिणाम मानवी जीवनावर झपाट्याने होत होता. त्यामुळे मानवी जीवन शैली झपाट्याने बदलू लागली. स्पर्धा अधिकच वाढू लागली.मग बदलेली नवी पिढी, यांचे विचार दृष्टीकोन बदलत गेले, प्रश्न बदलत गेले. स्वार्थी, आत्मकेंद्रित विचार वाढायला लागले. कुटुंबापेक्षा व्यक्तिगत सुखाला महत्व येऊ लागले, नैतिक मुल्ये पायदळी तुडवली जाऊ लागली तर कधी सुखाच्या मागेधावताधावता खरे सुख निसटून जाऊ लागले.असे प्रश्न असताना मानवी मुल्ये अजूनही जिवंत आहेत. माणूस अजूनही पार तो विसरला नाही हे दाखूवन देण्याचे काम अभिराम भडकमकर यांनी आपल्या नाटकातून केले आहे. ते म्हणतात, "या सगळ्यात जसा माझा शोधाचा, माडणीचा केद्रबिंदू माणूस हाच असतो तसाच माझ्या मांडणीचे प्रयोजनही समोरचा प्रेक्षकवर्गच असतो मला प्रेक्षकांशी फटकून राहावस वाटत नाही. कदाचित मेळा, तमाशा, गोंधळ, भारूड यांच्या प्रभावामुळे असेल.पण करणारा आणि पाहणारा यातला संवाद मला फार महत्वाचा वाटतो. संख्या महत्वाची नाही. पण माझं नाटक मंचावरून उतरुन प्रेक्षकांत पोहोचण मला गरजेच वाटत. म्हणूनच माझं नाटक हे प्रेक्षक शरण नसत, तर प्रेक्षकाभिमुक असत."नाट्यलेखनामागील आपली भूमिकाच त्यांनी इथे स्पष्ट केली आहे.

'पाहुणा' हे त्यांचे कौटुंबिक स्वरूपाचे नाटक, नातेसबधावर प्रकाश टाकणारे भारतीय परंपरेतील एक संस्कारीत नाटक, बदलत्या काळात जीवनात यश अपयश, वाढत जाणारा हव्यास, नीती मुल्यांची होणारी पडझड आणि मग शेवटी कुठेतरी वाईट विचारामुळे करावा लागणारा पश्चाताप, या सर्वाचे चित्रण या नाटकात पहावयाचे मिळते. 'पाहुणा' मधील अनंत गायक होण्यासाठी मुंबईत येतो. त्याला प्रयत्न

करूनही यश मिळत नाही. तर त्याचा मित्र बाब्या यालाही काम करूनही स्वतःचे घर निर्माण करता येत नाही. मग ही पात्रे जेव्हा वाम मार्गाला लागतात, अनैतिकतेचा मार्ग स्वीकारतात तेव्हा त्यांना पुन्हा भानावर आणले जाते, स्वतःमधील चांगुलपणाची जाणीव करून दिली जाते. शेवटी माणसाच्या जगण्याला कष्टाचा मेहनतीचा सुगंध असतो. मनावर प्रेम करणारी माणसेच अधिक मोठी असतात आणि रक्ताच्या नात्या पेक्षा ही जोडलेली नाती अधिक महत्त्वाचे असतात, असा संदेश हे नाटक देते.

'ज्याचा त्याचा प्रश्न' हे एक ज्वलंत प्रश्नावर लिहिलेले नाटक आहे. **1992** मधील मुंबईच्या दंगलीत या नाटकाचे धागे गुंतले आहेत. या दंगलीमागे देव आणि धर्मच आहे. मग तो देव कसा आहे, धर्म कसा आहे. याबद्दलची मांडणी करणारे विचार करायला भाग पाडणारे हे सुंदर नाटक आहे. हे नाटक समाजाला अधिक डोळस बनवते. श्रद्धा आणि अंधश्रद्धा, सत्य असत्य, ज्ञान आणि विज्ञान, भावना आणि बुद्धी यामधील फरक उलगडवून दाखवणारी ही एक कलाकृती आहे. ती रसिकांना देव नाकारायला सांगत नाही तर ती माणसातला देव ओळखायला शिकवते. 'ज्याचा त्याचा प्रश्न' मधील सुभाष हा मध्यमवर्गीय जीवन जगणारा एक उत्तम कलावंत. तो स्वभावाने साधा सरळ आणि प्रामाणिक आहे. पण नंतर मात्र त्याचा स्वभाव बदलत जातो. सुशिक्षित असूनही दैव, नशीब, कर्मकांड यावर त्याचा विश्वास आहे. किंबहुना सुभाष अधिक प्रगती साधू शकत नाही. पण पुढे श्रीमंत झाल्यावर त्याची देवाकडे बघण्याची दृष्टी बदलते. देवाला घाबरणारा सुभाष आता बदललेला असतो. मध्यम वर्गीय जीवन जगताना देव, पाप, पुण्य यांना घाबरणारा सुभाष आता किती संवेदनाशून्य झालाय हेच यातून दिसते. पण भास्कर त्याच्यातील माणूस जागा करतो. मोलकरणी असलेल्या सगुणाला पैशापेक्षा मूल हवे असते, त्यामुळे 'देवी अंगातून गेली' असे ती सांगते. पण तरीही नवऱ्याचा अत्याचार तिला सहन करावा लागतो. आई कडूनही तिला संरक्षण मिळत नाही पण भास्कर तिला संरक्षण देतो. नवरा तिला भास्कर विरोधात खोटी साक्ष दे, अस सांगतो. पण ती सत्याची, न्यायाची बाजू घेते. तीभास्कर विरोधात साक्ष देणार नाही, असं निक्षून सांगते.भास्करचा सत्याचा, न्यायाचा, मानवतेचा वारसा चालवण्यासाठी तीच पुढे येते. या सर्व वर्णनातून समाजात अनैतिक मुल्ल्ये वाढत असली तरी नैतिक मूल्ये अजून टिकून आहेत, हे सुभाष व सगुना या पात्रातून दिसून येते.

'याच दिवशी याच वेळी' हे गर्भ नाट्य प्रकारातील एक महत्वाचे नाटक. बदलत्या काळात माणसाच्या गरजा ही बदलू लागल्या. औद्योगीकरणाचा, तंत्रज्ञानाचा मोठा परिणाम मानवी जीवनावर विशेषता कौटुंबिक जीवनावरही होऊ लागला. माणूस भौतिक साधनांच्या आहारी जाऊ लागला. पण भौतिक साधनांमुळे मानवाचे जीवन सुखी बनण्याऐवजी ते अधिकच जटील होऊ लागले. हेच या नाटकातून व्यक्त होताना दिसते 'याच दिवशी याच वेळी' मधील सुरेंद्र, अनघा, विशाखा, मानस ही सर्व पात्रे भौतिक सुखात अडकलेली आहेत. वाढत्या प्रसार माध्यमांमुळे व भौतिक साधनांमुळे स्वकेन्द्रित जीवन जगत आहेत. एकमेकाशी बोलायला, समजून घ्यायलाही यांच्याकडे वेळ नाही. अशावेळी टीव्हीवरील 'आशाताई' यांच्यातील माणूसपण जागे करतात. अभिराम भडकमकर हे केवळ जीवनातील नैराश्य मांडत नाहीत तर त्यांच्यातील नैराश्य दूर करून माणूसपणही जागे करण्याचा प्रयत्न करतात.

स्त्री-पुरुष संबंधाकडे डोळसपणे पाहायला लावणारे आणि लैंगिक विषयावर अर्थपूर्ण विचार करायला लावणारे नाटक म्हणजे 'देहभान' होय. हे नाटक देखील गर्भ नाट्य प्रकारातील आहे. एकविसाव्या शतकात अजूनही आपल्याकडे लैंगिकतेविषयी मुक्तपणे बोलले जात नाही. विचारात परिवर्तन झालेले दिसून येत नाही. स्त्रीकडे केवळ भोगवादी दृष्टिकोणातून पाहणे, तिच्या चारित्र्याविषयीची संकल्पणा, स्त्री-पुरुषांची एकमेकाविषयीची आसक्ती, मुलामुलींच्या वाढत्या वयानुसार शारीरिक व मानसिक होत जाणारे बदल यासारख्या अनेक विषयावर आपण मुक्तपणे चर्चा करत नाही. त्याचे चित्रण या 'देहभान' नाटकातून केलेले आहे. देहभान नाटकातील आबासाहेब, दादासाहेब व सोहनी ही पात्रे पारंपरिक विचारसरणीची आहेत. त्यामुळे त्यांच्या विचाराचा दुष्परिणाम समाजजीवनावर होतो. विद्यावती, वसुधा व मावशी यासारख्या अनेक महिलांचे जीवन कठीण बनते. अशावेळी त्यांचे संकुचित विचार दूर करण्यासाठी मास्तर, पद्मनाभ, शिल्पा व किरण यासारखी नव्या विचारांची माणसे येतात. समाजाला नवा दृष्टिकोन देतात. र. धो. कर्वे यांनी पेरलेला विचार अभिराम भडकमकर यांनी यातून अगदी कलात्मक पद्धतीने सांगितला आहे. ते म्हणतात, हे नाटक सेक्स एज्युकेशन नाही, केवळ स्त्री-पुरुष संबंधावर ही नाही तर देहा बरोबरच नात्याच भानदेणार आहे, असं नाटकाबाबतचे मत पुण्यातल्या **2003** मध्ये झालेल्या परिसंवादात व्यक्त केले होते. देहा

सोबतच त्यात बसलेल्या मनाचा आदर करणं हे महत्वाचा आहे. आज हे नाटक वास्तवातील प्रश्नावरच अधिक भाष्य करते. बिघडत चाललेल्या नातेसंबंधानातपासून आयुष्यातल्या लैंगिक गरजांना अवकाश किती असतो. यावर देहभान हे नाटक व्यक्त होते. कालखंडानुसार बदलत जाणारे विचार, बदलत जाणारी मानसिकता यातील पात्रातुन व्यक्त होते. स्त्री पुरुष संबंध या मध्यवर्ती आशय सूत्रावर हे नाटक बेतलेले आहे.

अभिराम भडकमकर यांचे कौटुंबिक पार्श्वभूमी असलेले आणखी एक सुंदर नाटक म्हणजे 'सुखांशी भांडतो आम्ही' हे नाटक होय. मानवी मनाचा सुखाचा शोध घेणारे हे नाटक नातेसंबंधावर, त्यामधील एकमेकांच्या प्रेमावर, प्रकाश टाकते. सुख म्हणजे नेमके काय? याचा शोध घ्यायला लावते. सुखाची कल्पना व्यक्तीपरत्वे बदलत जाते. त्यामुळे लहान लहान गोष्टीतून मिळणारे सुख नकळतपणे माणूस दवडतो. त्याची जाणीव ही या नाटकातून होते. शिक्षणाने माणूस समृद्ध होतो पण कधीकधी शिक्षणाने माणूस अतिविचार ही करायला लागतो. मनाशीच तो अधिक संवाद साधतो त्याची आतल्या आत घुसमटत होते. हे नाटक देखील अशाच एका 'सदा' या व्यक्तिरेखेने भोवती फिरते. सदाला स्किझोफ्रेनिक आजार झालेला आहे. त्याचे व्यक्तिमत्त्व दुभंगलेले आहे तो वेडा असूनही शहाण्यासारखा वागतो. मग तोच श्रीधर, मीना अथवा प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडतो. सुख म्हणजे नेमकं काय ते पटवून देतो.

समाजाला जागृत करणे, त्यांना डोळस बनविणे व अधिक समृद्ध करणे याच हेतूने त्याने नाट्यलेखन केले आहे'सुखाशी भांडतो आम्ही' मधील डॉक्टर श्रीधर व मिताली हे नवश्रीमंत दांपत्य. हे फक्त स्वतःच्या सुखासाठी धडपडत असतात. अधिकाधिक पैसा मिळवून मोठे अत्याधुनिक हॉस्पिटल बांधायचे असे त्यांचे स्वप्न असते. यासाठी ते गैर मार्गाचाही अवलंब करतात. दुसऱ्याचे सुख प्रसंगी ते ओरबाडून घेतात. पण शेवटी वेडा असणारा 'सदा' त्यांना त्यांच्या चुकीची जाणीव करून देतो. सुख मिळवण्यासाठी अगोदर सुख पेरावं लागतं. हे साध त्याचं तत्त्व आहे. सदाच्या या विचाराने श्रीधर वमिताली भानावर येतात आणि गैरमार्गाने मिळवलेल्या जमिनीवर बालोद्यान निर्माण करतात. शहरा ऐवजी गावात हॉस्पिटल उभे करायचा निश्चय करतात. एकूणच अभिराम भडकमकर हे भरकटलेल्या, आत्मकेंद्रित झालेल्या, माणुसकी विसरत चाललेल्या माणसाला, समाजाला माणुसकीची मानवी नैतिक मूल्यांची जाणीव करून देतात.

अभिराम भडकमकर यांच्या नाटकातील प्रश्न हे कौटुंबिक, सामाजिक घसरत चाललेली नीतिमूल्ये, बदलत चाललेली नवीन पिढी, त्यांचे विचार व भौतिक साधनांमुळे हरवत चाललेले नातेसंबंध, यावर प्रामुख्याने आधारित आहेत. नाट्यसमीक्षक निलकंठ कदम म्हणतात,"समाजाच्या पृष्ठ स्तरावर अथवा अंतरावर चर्चिल्या जाणाऱ्या एखाद्या सामाजिक समस्येला नाटकाच्या केंद्रस्थानी ठेवायचे आणि त्या अनुषंगाने त्या समस्येशी संबंधित असणाऱ्या विविध प्रश्नांना नाट्य वस्तूमध्ये उपस्थित करावयाचे हे त्यांच्या लेखनाचे प्रमुख वैशिष्ट्य सांगता येईल. त्यांची सर्व नाटकेही कौटुंबिक नातेसंबंधावर प्रकाश टाकणारी आहेत. आई वडील, मुले यासारखी नाती एकमेकावर जिवापाड प्रेम करतात. म्हणून यांच्या नाटकात नातेसंबंधला त्यानी अधिक अधोरेखित केलेले आहे. माणसाची धडपड, त्याला मिळणारे यश अपयश आणि शेवटी अपयशावर, वाईटपणावर नैतिक मूल्यांनी आणि मिळवलेला विजय महत्वाचा आहे. त्यामुळे नाटकाच्या शेवटी सद्गुणांचा, सत्याचा, प्रामाणिकपणाचा विजय होतो हेच त्यांनी आपल्या लेखनातून दाखवून दिले आहे.

## संदर्भसूची :

१. भडकमकर अभिराम, ललित, नाटक विशेषांक, ऑक्टोबर **2013**

२. भडकमकर अभिराम, दैनिक लोकसत्ता, लोकरंग, रविवार दिनांक **14** जून **2015**

३. नाडकर्णी कमलाकर, महानगरी नाटक, अक्षर प्रकाशन मुंबई

४. भडकमकर अभिराम, दैनिक लोकसत्ता, चतुरंग, वळण वाटा, **31** ऑक्टोबर **2015**